# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-२४** **दिनांक - २७/०१/२०२४**

## खुनाचा गुन्हा उघडकीस आणुन आरोपीला अटक
## अर्नाळा सागरी पोलीस ठाणे ची कामगीरी

अर्नाळा सागरी पोलीस ठाणे अकस्मात मृत्यु रजि.नं । १३/२०२४ सी.आर.पी.सी १७४ प्रमाणे मधील खबर देणार अनिल चंदय्या शनगरपु वय- ५० वर्षे, कामधंदा- रिक्षा चालक रा. रुम नं.५७, इंदिरानगर रहिवाशी संघ कोठार लेपोरा स्ट्रीट ६० फुटी रोड भाईंदर प.ता.जि. ठाणे मो.नं- ९९३०९३४१७१ यांनी खबर दिली की, त्याचा मयत भाऊ नामे नागेश चंदय्या सेनीगरपु वय- ४८ वर्षे धंदा. शिक्षक रा. रुम नं. ३०४ बी विंग पृथ्वी बिल्डींग प्रिमियमपार्क विरार प.ता.वसई जि.पालघर याने रहाते घरी दि.२१/०१/२०२४ रोजी सायंकाळी ०७.०० वा.चे पुर्वी अज्ञात कारनाने दोन्ही हाताच्या नसा कापुन त्यातुन अति रक्त स्त्राव होवुन तो मयत झाले बाबत खबरी वरुन दि.२२/०१/२०२४ रोजी ०३.२१ वाजता वरील प्रमाणे अकस्मात मृत्यु दाखल असुन सदर अकस्मात मृत्युचा तपास सपोनि/ दळवी हे करीत होते.

सदर अकस्मात मृत्युचे तपासात मयत वापरत असलेला मोबाईल घटनास्थळी किंवा इतर कोठेही मिळुन आला नाही. तसेच घटना घडल्याचे अगोदर रात्री एक संशयीत इसम मयत राहत असलेल्या बिल्डींग मध्ये जातांना व चार तासानंतर परत येताना दिसत असल्याने तसेच मयत याचा मोबाईल नंबर त्याचे सोबत राहणारा साक्षीदार याच्याकडुन प्राप्त करुन मोबाईल नंबरचे सी.डी.आर प्राप्त केले असता मयताचे मोबाईलचे लोकेशन हे विरार येथुन गोरेगाव येथे असल्याचे दिसुन आल्याने मयत याचा कोणीतरी अज्ञात कारणावरुन खुन करुन मोबाईल घेवुन निघुन गेला असल्याचे अकस्मात मृत्युचे चौकशीत निष्पन्न झाल्याने सदर बाबत सरकार तर्फे सपोनि/ रुपेश दळवी यांनी फिर्याद दिल्यावरुन अर्नाळा सागरी पोलीस ठाणे येथे गु.र.न. ३१/२०२४ भा.द.वि.स कलम ३०२ प्रमाणे दिनांक २३/०१/२०२४ रोजी १६.२५ वाजता गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास सपोनि/ रणजितसिंग परदेशी हे करत आहेत.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने मा.वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नमुद खुनाचे गुन्हयाचा तपास करता अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे अधीकारी व अमंलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन मयत याचे मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीत याचे नाव निष्पन्न करुन सदर आरोपी हा बांगुरनगर मेट्रो स्टेशन जवळ असल्याची माहीती प्राप्त करुन लागलीच पोलीस पथक रवाना करुन त्याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्याची विचारपुस करता त्याचे त्याचे नाव अलफरान चाँद उस्मान खान, वय २२ वर्षे, बी/२१, बी.एम.सी. कॉलनी, मिठानगर, बांगुरनगर मेट्रो स्टेशन जवळ, मुंबई, मुळ रा. प्लॉट नंबर ३८, कुसुम गार्डन, क्रिष्णा नगर जवळ, निबायंडा, पोस्ट निबायंडा, थाना निबायंडा, ता.चितोडगड, जि. चितोडगड, राज्य राजस्थान असे असल्याचे सांगुन त्याने मयत यास पैश्याचे कारणावरुन बेल्डच्या साहयाने मयताच्या दोन्ही हाताच्या मनगटाजवळील नसा कापुन व गळा दाबुन जिवे ठार मारल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदरचा अकस्मात मृत्यु घडले तारखेपासुन २४ तासाचे आत उघडकीस आणला आहे. आरोपीत यास दिनांक २३/०१/२०२४ रोजी सदर गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कारवाई मा. श्री सुहास बावचे पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३ विरार, मा. श्री राजेंद्र मोकाशी, सहायक पोलीस आयुक्त सो, नालासोपारा विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली, अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय पाटील, पो.नि. विठ्ठल चौगुले, स.पो.नि. रणजितसिंग परदेशी, रुपशे दळवी, जयचंद ठाकुर, पो.उप.निरी. रतिकांत भद्रशेट्टे, राजाराम गहिले, स.फौ. जनार्दन मते, शिवराम डामरे, पो.हवा.मधुकर अवतार, विलास पवार, संदिप मोरोळे, तोडेकर, राजेंद्र पवार, नामदेव ढोणे, पो.अं. विजयकुमार आळंगे, प्रविण शिगोळे, प्रविण मंझा, सोहेल शेख यांनी केली आहे.

